**पुणे जिल्हा परिषद**

**आरोग्य विभाग रिक्त पदांची कंत्राटी / मेहनताना तत्वावर भरती**

पुणे जिल्हा परिषद- पुणे आरोग्य विभाग यांच्याकडील राष्ट्रीय आरोग्य अभियान, कोविड-१९ तसेच अन्य कार्यक्रमातील रिक्त पदांची, तीन महिन्याकरिता (आवश्यकतेप्रमाणे कालावधी कमी / जास्त करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहे) कंत्राटी पद्धतीने भरती प्रक्रिया ही खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे एकत्रित मेहनताना तत्वावर होणार असून खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | उच्चतम वयोमर्यादा | दरमहा एकत्रित मेहनताना |
|---|---|---|---|---|---|
| १ | गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट- Gastroenterologist | १ | DM Gastroenterology | ५० वर्षे | रु. १,२५,०००/- |
| २ | सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ- Microbiologist | १ | MD Microbiology | ५० वर्षे | रु. ७५,०००/- |
| ३ | फिजीशियन / औषध सल्लागार- (Physician/Consultant Medicine) | १३ | MD Medicine/ DNB | ५० वर्षे | रु. ७५,०००/- |
| ४ | भूलतज्ञ- (Anesthetists) | १७ | MD Anaesthesia / DA / DNB | ५० वर्षे | रु. ७५,०००/- |
| ५ | शल्य चिकित्सक- Surgeon | १ | MS General Surgery/DNB | ५० वर्षे | रु. ७५,०००/- |
| ६ | वैद्यकीय अधिकारी (MBBS MO) | २०४ | M B B S | ४३ वर्षेपर्यंत | रु. ६०,०००/- |
| ७ | आयटी ऑपरेशन ॲडमिनीस्ट्रेशन- IT Operation Administration | १ | BE (IT) | ४३ वर्षेपर्यंत | रु. ५०,०००/- |
| ८ | रुग्णालय व्यवस्थापक (Hospital Manager) | २९ | वैद्यकीय पदवीधर व MBA in healthcare/Hospital management | ४३ वर्षेपर्यंत | रु. ४०,०००/- |
| ९ | अधिसेविका- Matron | १ | Bsc (Nursing) / Msc (Nursing) /With 10 Years of Experience | ५० वर्षे | रु. ४०,०००/- |
| १० | सह अधिसेविका- Asst. Matron | १ | Bsc (Nursing) / Msc (Nursing) /With 10 Years of Experience | ५० वर्षे | रु. ३५,०००/- |
| ११ | आयुष वैद्यकीय अधिकारी- (MBBS MO) | १४ | BAMS, BHMS, BUMS / वैद्यकीय पदवीधर | ४३ वर्षेपर्यंत | रु. २८,०००/- |
| १२ | स्टाफ नर्स- Staff Nurse | ७०१ | GNM/B sc Nursing | ४३ वर्षेपर्यंत | रु. २०,०००/- |
| १३ | क्ष- किरण तंत्रज्ञ- (X-Ray Technician) | २४ | क्ष- किरण तंत्रज्ञ उत्तीर्ण (शासनमान्य) | ४३ वर्षेपर्यंत | रु. १७,०००/- |
| १४ | ई. सी. जी. तंत्रज्ञ- (ECG Technician) | २७ | ई. सी. जी. तंत्रज्ञ उत्तीर्ण (शासनमान्य) | ४३ वर्षेपर्यंत | रु. १७,०००/- |
| १५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ- (Lab Technician) | ३८ | DMLT | ४३ वर्षेपर्यंत | रु. १७,०००/- |
| १६ | औषधनिर्माता (Pharmacist) | ११ | B Pharm | ४३ वर्षेपर्यंत | रु. १७,०००/- |
| १७ | ब्लॉक समुदाय व्यवस्थापक- (Block Community Manager) | १ | Any graduate with Typing skill, Marathi - 30 words per minute , English 40 words per minute with MSCIT | ४३ वर्षेपर्यंत | रु. १७,०००/- |
| १८ | तालुका अकौंटंट | १ | B. Com with Tally | ४३ वर्षेपर्यंत | रु. १७,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९ | रिसेप्शनिष्ट (Receptionist) | ३ | किमान १२ वी पास, संगणक ज्ञान आवश्यक | ३८ वर्षेपर्यंत | रु. १५,०००/- |
| २० | वॉर्ड बॉय | २०० | १० वी उत्तीर्ण | ४३ वर्षेपर्यंत | रु. १२,०००/- |
| २१ | बेडसाईड असिस्टंट | २०० | १० वी उत्तीर्ण | ४३ वर्षेपर्यंत | रु. १२,०००/- |
| | **एकूण पदे** | **१४८९** | | | |

**अटी आणि शर्ती**

1. इच्छुक उमेदवारांनी दिनांक ७ जुलै २०२० पासून ते १५ जुलै २०२० सायंकाळी ५ वाजेपर्यंत, पुणे जिल्हा परिषदेच्या अधिकृत वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने सादर करावा. अर्जासोबत अपलोड करावयाची कागदपत्रे खालील प्रमाणे:
    a. वयाचा पुरावा
    b. पदवी / पदविका प्रमाणपत्र
    c. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As applicable)
    d. शासकीय / निमशासकीय संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र
    e. निवासी पुरावा
    f. जातीचे प्रमाणपत्र
    g. उमेदवाराचा सद्याच्या पासपोर्ट साईज फोटोसह विहित नमुन्यात सुवाच्य अक्षरात भरलेला अर्ज
2. विहित नमुन्यातील अर्ज हे फक्त ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यात येतील. पोस्टाद्वारे / कुरियर ने किंवा प्रत्यक्ष आणून दिलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
3. सदर पदांसाठी विहित अर्जाचा नमुना https://punezp.mkcl.org/ या पुणे जिल्हा परिषदेच्या अधिकृत वेबसाईटवरून डाऊनलोड करून घ्यावा.
4. उपरोक्त पदांसाठी, उपरोक्त जाहिरातींमध्ये नमूद केलेल्या पदांकरिता अपेक्षित उमेदवार उपलब्ध न झाल्यास, एन. एच, एम. अंतर्गत व्यवस्थापनाकरीता सदरील पदे भरणे आवश्यक असल्याने उक्त शैक्षणिक अर्हताधारक शासकीय सेवानिवृत्त उमेदवार हे सदर पदाकरिता पात्र राहतील.
5. उमेदवाराने सोबत जोडलेल्या विहित अर्जाच्या नमुन्यामध्ये ज्या पदासाठी अर्ज केलेला आहे त्या पदाचे नाव स्पष्ट नमूद करावे. खाडाखोड केलेले, अवाचनीय अर्ज सादर केल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी.
6. कौन्सिल कडील नोंदणी बाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीसाठी असावी. तथापि वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
7. उमेदवार हा उपरोक्त जाहिरातीतील सर्व पदांकरिता सक्षम, काम करण्यास तयार असावा, बॉंड संपलेले विहित वयोमर्यादेतील वैद्यकीय अधिकारी यांनाही अर्ज करता येईल.
8. सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील भरलेला अर्ज, इतर परिपूर्ण माहिती व आवश्यक दस्ताऐवज, कागदपत्रे स्कॅन करून दिनांक १५ जुलै २०२० सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत 'मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे' यांच्या नावे ऑनलाईन अर्ज सादर करावा. यासाठी ऑनलाईन अर्जाची लिंक जिल्हा परिषदेच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध करून दिली जाईल. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज आणि अपूर्ण माहितीच्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. (सर्व व्यक्तींनी सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यात (जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर उपलब्ध अर्जाचा नमुना) अर्ज करणे बंधनकारक राहिल.

9. सदरची पदे ३ महिन्यांच्या कंत्राटी तत्वावर भरण्यात येणार आहे. तथापि आवश्यकतेनुसार पुढील कालावधी वाढविण्याचा अथवा वाढविण्यात आलेला कालावधी कमी करण्याचा अधिकार प्रशासनाचा राहिल.
10. पदासमोर नमूद मेहनताना एकत्रित मेहनताना असून त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय असणार नाहीत.
11. ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जांवरून व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरून मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करताना शैक्षणिक वर्षात मिळालेले गुण, उच्च शैक्षणिक अर्हता व शासकीय / निमशासकीय कार्यालयातील कामाचा अनुभव इत्यादी बाबी विचारात घेऊन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. आणि त्यानंतर संबंधित पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.
12. मेरीट लिस्ट तयार झाल्यानंतर ती https://punezp.mkcl.org/ या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल. पात्र / अपात्र उमेदवारांची यादी वेबसाईटवर प्रसिद्ध केल्यानंतर अल्पकालावधी आक्षेप घेण्यासाठी उपलब्ध करून दिली जाईल. विहित कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या आक्षेपाचा विचार करून अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येईल.
13. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. याबाबतचे स्वयं घोषणापत्र उमेदवाराने देणे आवश्यक आहे.
14. पुनर्नियुक्तीबाबत / नियमितपणे शासकीय सेवेत सामावून घेणे बाबत किंवा शासनाकडून सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.
15. उमेदवारांची अंतिम निवड ही ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात येणार आहे. त्यासाठी उमेदवाराने आपली परिपूर्ण शैक्षणिक अर्हता, धारण केलेला अनुभव इत्यादी परिपूर्ण माहिती भरणे आवश्यक राहील. जिल्हा परिषदेच्या कार्यालयामध्ये कुठल्याही प्रकारचे थेट कागदपत्रांच्या स्वरूपातील अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. संबंधिताने शैक्षणिक अर्हता व कामाचा अनुभव यांबाबत सादर केलेल्या कागदपत्रांची संबंधीत प्रमाणपत्र देणाऱ्या संस्था / कार्यालय यांच्याकडून पडताळणी करून घेण्यात येणार आहे. कोणत्याही उमेदवाराने कार्यालयात चुकीची आणि खोटी प्रमाणपत्रे सादर केयाचे आढळून आल्यास संबंधिता विरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात येईल.
16. अर्जदारांनी ऑनलाईन अर्जामध्ये आपला मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी अचूक नोंदवावा आणि भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यात कोणताही बदल होणार नाही याची दक्षता घ्यावी.
17. भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही खरी माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी / नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.
18. भरती प्रक्रियेचे संपूर्ण अधिकार जसे की, अधिकार पदे कमी जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तींमध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांनी राखून ठेवलेले आहेत.
19. पदभरती करणे संदर्भात पत्रव्यवहार वैयक्तिकरित्या उमेदवाराशी करण्यात येणार नाही. भरती बाबत च्या सर्व सूचना व अनुषंगिक बाबी जिल्हा परिषदेच्या अधिकृत वेबसाईट वर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल.

सही/- XXX

आयुष प्रसाद (भाप्रसे)

मुख्य कार्यकारी अधिकारी

पुणे जिल्हा परिषद, पुणे

स्वत: साक्षांकित केलेला
अलीकडच्या काळातील
पासपोर्ट साईजच्या
आकारातील फोटो लावावा

**पुणे जिल्हा परिषद पुणे- विहित नमुना अर्ज**

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे जिल्हा परिषद पुणे,

**पदाचे नाव:** ........................................................................................

१) **उमेदवाराचे संपूर्ण नाव** :- ........................................................................................

२) **उमेदवाराच्या वडिलांचे संपूर्ण नाव**:- ........................................................................................

३) **जन्मदिनांक** :- वर्ष ____________ महिना ____________दिवस ____________

अक्षरी........................................................................................

वय:- ....................वर्षे पूर्ण. ..................महिने, ......................दिवस
(जाहिरात प्रसिद्ध झालेच्या दिवशी)

४) **राहण्याचा पत्ता** :- ........................................................................................

........................................................................................

........................................................................................

मोबाईल क्रमांक (अनिवार्य) :- ......................................................

ईमेल आयडी:- ..........................................................................

५) **अर्जदाराकडे रहिवासी प्रमाणपत्र आहे का? :-** होय / नाही

६) **अर्जदार विवाहित आहे का?** :- होय / नाही

७) **शैक्षणिक पात्रता**

| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशील | बोर्ड / विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

८) **अनुभव:-** अनुभवाची सर्व कागदपत्रे एकत्र पीडीएफ करून ऑनलाईन अपलोड करावीत.

| **अ.क्र.** | **यापूर्वी काम केलेल्या कार्यालयाचे नाव व पत्ता** | **धारण केलेले पद** | **कालावधी** | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्षे | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

९) **अर्जासोबत जी कागदपत्रे ऑनलाईन अपलोड केलेली आहेत त्यांच्या नावापुढे टिक ✓ करा.**

a. वयाचा पुरावा
b. पदवी / पदविका अथवा अन्य शैक्षणिक अर्हता असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र
c. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As applicable)
d. शासकीय / निमशासकीय संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र (असल्यास)
e. निवासी पुरावा
f. संगणकीय ज्ञान / कौशल्ये अथवा टंकलेखन वेगाबाबत ची प्रमाणपत्रे (असल्यास)
g. बॉंड संपलेले वैद्यकीय अधिकारी असल्यास त्याबाबतचा पुरावा

११) **स्वयं घोषणापत्र:-**

वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करूनच हा अर्ज मी करीत आहे. मी असे प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास, नोकरी गमावल्यास व त्यानुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र आणि बांधील राहिल. व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातीत नमूद केलेल्या अटी आणि शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :- ..........................................    स्वाक्षरी :- ....................................................

दिनांक :- ..........................................    अर्जदाराचे नाव :-.....................................................